**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्यावेळी प्रचार फेरी व मिरवणुकीमध्ये करावयाचा वाहनांचा वापर**

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**क्रमांक-रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.१९/का-५,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- ११ ऑक्टोबर, २००६.**

### आ दे श

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्यावेळी प्रचार फेरी किंवा प्रचारासाठी मिरवणुका काढण्यात येतात. त्यांवेळी वाहनांचा वापर कोणत्या मर्यादेत असावा याबद्दल विविध स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सतत विचारणा होत असते. त्यास अनुसरुन राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:-

(१) प्रचार फेरी किंवा प्रचार मिरवणुकीत महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समिती यांच्या क्षेत्रांमध्ये जास्तीत जास्त तीन वाहनांचा समावेश करण्यात येईल. ही प्रचार फेरी अथवा मिरवणूक जर एकाच उमेदवाराची असेल तर त्या उमेदवाराने त्या प्रचार फेरीचा येणारा खर्च आपल्या खर्चात समाविष्ट केला पाहिजे. जर प्रचार फेरी पक्षातर्फे अथवा आघाडीतर्फे काढण्यात आली असेल तर ती प्रचार फेरी अथवा मिरवणूक ज्या प्रभागांमधून जाईल त्या सर्व प्रभागांमधील त्या पक्षाच्या किंवा आघाडीच्या उमेदवारांमध्ये तो खर्च विभागून दाखविण्यात येईल.

(२) ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये प्रचार फेरीत जास्तीत-जास्त एका वाहनाचा समावेश करण्यात येईल. त्याचा खर्च संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करण्यात येईल.

यासंबंधी पूर्वी काढलेले सर्व आदेश रद्द करण्यात येत आहेत.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,

१) सर्व महानगरपालिका आयुक्त
२) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
३) सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
४) सर्व तहसिलदार
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने